# युवाशक्ती कला व विज्ञान महाविद्यालय, अमरावती


टांक बाजार, छत्री तलाव रोड, अमरावती - ४४४६०६
फोन : 0721-257967
मो. 9422015113, 9545005639
वेबसाईट : www.yuvashakticollege.org
Email : yascamt@rediffmail.com, yascamt@gmail.com
प्रवेश साईट : https://yuvashakti.admissionerp.in


युवाशक्ती सामाजिक व शैक्षणिक संस्था, अमरावती
द्वारा संचालित (र.नं. F3819)

# युवाशक्ती कला व विज्ञान महाविद्यालय, अमरावती

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित (कॉलेज कोड-१७४)



## माहिती पत्रक
सत्र : २०२३-२४

मुल्य रु.२०/-

# युवाशक्ती कला व विज्ञान महाविद्यालय

टांक बाजार, फरशी स्टॉप, छत्री तलाव रोड, अमरावती

## महाविद्यालय विकास समिती

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मा. श्री. विलास महादेवराव इंगोले | - | अध्यक्ष |
| २) | मा. श्री. राजेंद्र भा. महल्ले | - | संस्था प्रतिनिधी |
| ३) | प्राचार्य डॉ. अजय व्ही. गुल्हाने | - | समिती सचिव |
| ४) | प्रा. श्री. अनिल बुरघाटे | - | संशोधन प्रतिनिधी |
| ५) | प्रा. श्री. यशवंत हरणे | - | शिक्षण प्रतिनिधी |
| ६) | प्रा. श्री. अभय ढोबळ | - | सामाजिक प्रतिनिधी |
| ७) | प्रा. डॉ. सौ. एन. व्ही. इंगोले | - | विज्ञान विभाग प्रमुख |
| ८) | प्रा. डॉ. एन.पी. माहोरे | - | कला प्रमुख |
| ९) | प्रा. ए. आर. धोटे | - | शिक्षक प्रतिनिधी |
| १०) | प्रा. डॉ. डि. के. राऊत | - | शिक्षक प्रतिनिधी |
| ११) | प्रा. ए. जी. मनवर | - | शिक्षक प्रतिनिधी |
| १२) | प्रा. डॉ. एस. एन. कोंबे | - | आय.क्यु.ए.सी. समन्वयक |
| १३) | श्री. एस. पी. बुटे | - | शिक्षकेतर प्रतिनिधी |
| १४) | जय मुनेश्वर | - | अध्यक्ष विद्यार्थी परिषद |

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १) | प्राचार्यांचे निवेदन | १ |
| २) | युवाशक्ती कला, विज्ञान महाविद्यालय<br>(विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे केंद्रस्थान) | ३ |
| ३) | महाविद्यालयातील शैक्षणिक अभ्यासक्रम | ४ |
| ४) | वैशिष्ट्यपूर्ण अभ्यासक्रमाची विशेष माहिती | ६ |
| ५) | महाविद्यालयातील शैक्षणिक विशेष योजना | ९ |
| ६) | महाविद्यालय प्रवेश प्रक्रिया | १० |
| ७) | शैक्षणिक शुल्क व सवलती / शिष्यवृत्ती | १२ |
| ८) | क्रिडा, सांस्कृतिक व सामाजीक उपक्रम | १९ |
| ९) | विद्यार्थी व पालकांना विशेष सूचना | २३ |
| १०) | शैक्षणिक सत्र व सुट्या | २४ |

## प्राचार्याचे निवेदन....

युवाशक्ती कला व विज्ञान महाविद्यालय येथे प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या सर्व विद्यार्थी व विद्यार्थीनीचे हार्दिक स्वागत करतो. या महाविद्यालयाविषयी विशिष्ट दृष्टीकोन समोर ठेऊन आपण आपला प्रवेश निश्चित करण्याचे ठरविले असेल. समाजाचा कणा समजल्या जाणारी युवाशक्ती आज इतस्थतः विखुरलेली दिसून येते. तिला एकत्र करुन तिचा रचनात्मक कार्यासाठी उपयोग करणे व तिला सुसंस्कारीत करणे या सगळ्या प्रयत्नांचा भाग म्हणून या महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली.

उच्च शिक्षण केवळ पाठ्यपुस्तकावर आधारित असू नये तर मनुष्याला सुसंस्कारित करण्याचा, परिपूर्ण करण्याचा प्रयत्न करणारे अभ्यासक्रम असावे. स्वयंरोजगाराला चालना देण्याच्या अनेकविध योजना यांचा अंतर्भाव उच्च शिक्षणात असावा या विचारांच्या अनुषंगाने पायाभूत विषयांसोबत विज्ञान शाखेत पर्यावरणशास्त्र, औद्यागिक रसायनशास्त्र, संगणकशास्त्र, जैविक तंत्रज्ञान असे विषय आपल्या महाविद्यालयात शिकविल्या जातात. आपला देश भौगोलिक, नैसर्गिक दृष्ट्या समृध्द आहे. ही जमेची बाजू लक्षात घेता कृषी, वनसंपत्ती, खनिजे यावर आधारित व्यावसायिक अभ्यासक्रम पदवी स्तरावर सुरु करण्यात आले आहेत.

हे महाविद्यालय युवाशक्ती सामाजिक व शैक्षणिक संस्थेव्दारा संचालित आहे. या संस्थेकडे स्वतःची ११ (अकरा) एकर आणि मौजे बडनेरा येथे १.०४ हे. आर. अशी विस्तीर्ण जागा मार्डी रोड, अमरावती या परिसरात आहे. संस्थेकडे महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असणारी आधारभूत संरचना उपलब्ध आहे.

महाविद्यालयाची विकास समिती प्राध्यापकांच्या सहकार्याने अनेक कार्यक्रमाचे आयोजन करते. या आयोजनाची प्रत्यक्ष जबाबदारी विद्यार्थ्यावर सोपवून त्यांच्या कलागुणांना वाव देण्याचा प्रयत्न यातून होतो. समाज जीवनाचे यथार्थ दर्शन जिथे घडते त्या ठिकाणी राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबीर घेऊन विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणिव निर्माण करण्याच्या प्रयत्न केला जातो.

शिक्षणातून संस्काराच्या बरोबरीने त्यातून निर्माण होणारे कर्तव्य याची जाणिव व्हावी, अशी शिकवण महाविद्यालयातून देण्याचा प्रयत्न असतो. आज सर्वदूर समाजातील आदर्श, व्यवहारात पाठ फिरवीत असल्याचे दिसते. तेव्हा हे आदर्श घडविण्याचे केंद्र म्हणून महाविद्यालय केवळ शैक्षणिक संस्था न राहता समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी प्रयत्नशील असलेले सक्रिय केंद्र व्हावे अशा भावी योजना आहेत. आम्ही त्या कार्यरत करण्याच्या प्रयत्नात आहोत.



या महाविद्यालयात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या पात्रता परिक्षेचा) निकाल वर्तमानपत्रात जाहीर झाल्यापासून दहा दिवसाचे आत आपले प्रवेश अर्ज कार्यालयात सादर करावे. तसेच पात्रता परिक्षेच्या निकालापासून तो दिवस सोडून विसाव्या दिवशी विद्यार्थ्यांनी सर्व आवश्यक कागदपत्रासह प्रवेशाकरिता महाविद्यालयात हजर राहावे व प्रवेश शुल्क भरुन आपला प्रवेश निश्चित करावा. सर्व उत्तीर्ण व प्रवेशित विद्यार्थांचे अभिष्टचिंतन....

**डॉ. अजय व्ही. गुल्हाने**
(प्राचार्य)
युवाशक्ती कला व विज्ञान महाविद्यालय
अमरावती.

## महाविद्यालयाविषयी थोडेसे...

युवाशक्ती कला व विज्ञान महाविद्यालय हे टांक बाजार, फरशी स्टॉप, छत्री तलाव रोड, अमरावती या ठिकाणी स्थित आहे. सर्व बाजूंनी येण्यासाठी बसेस, परिवहन व्यवस्था उपलब्ध आहे. महाविद्यालयात कला आणि विज्ञान या शाखांतर्गत शिक्षणाची सोय आहे. आधुनिक (उपकरणांनी सुसज्ज अशा प्रयोगशाळा, ग्रंथालय, क्रीडा प्रकारातील विविध सुविधा हे महाविद्यालयाचे वैशिष्ट्ये आहे.

महाविद्यालयामध्ये वाङमय स्नातक (बी.ए.) या वर्गासाठी एकूण ९ (नऊ) विषय तर विज्ञान स्नातक (बी.एससी.) या वर्गासाठी एकूण १२ (बारा) विषय प्रवेशाकरिता उपलब्ध आहेत. महाविद्यालय आधुनिक काळात उपयोगी महत्वपूर्ण असे विषय कला व विज्ञान शाखेत शिकविले जातात. विज्ञान शाखेत- औद्योगिक रसायशास्त्र (Industrial Chemistry ) जिव तंत्रज्ञान (BioTechnology) पर्यावरण शास्त्र (एपींळीपाशपींरश्र डलळशपलश ) संगणक शास्त्र (Computer Science) सुक्ष्मजीवशास्त्र (Micro-biology) ह्या विषयांचे विशेष गट (Group) अशा पद्धतीने आखले आहेत कि, जेणे करुन विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर केवळ पदव्युत्तर शिक्षण हाच पर्याय न राहता स्वतःच्या पायावर उभे राहण्याचे सामर्थ्य व्यवसायत अथवा औद्योगिक क्षेत्रातील नोकरीव्दारे मिळावे.

महाविद्यलयीन काळात युवा मनातील सामाजिक जाणीव वाढवून जीवनाला योग्य दिशा देण्याच्या विधायक कार्याच्या दृष्टीने महाविद्यालय सातत्याने प्रयत्नशील असते. महाविद्यालय केवळ शैक्षणिक संस्था न राहता समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी प्रयत्नशील असलेले एक केंद्र व्हावे, अशी योजना आहे.

त्रिवर्षीय पदवी पाठ्यक्रम : (कला शाखा)
बी. ए. भाग १, २ व ३ करिता

अनिवार्य विषय - १) मराठी २) इंग्रजी

ऐच्छिक विषय -
१) इंग्रजी वाङमय
२) मराठी वाङमय
३) भुगोल
४) गृहअर्थशास्त्र (फक्त मुलींकरिता)
५) राज्यशास्त्र
६) समाजशास्त्र
७) तत्वज्ञान



ऐच्छिक विषयातील कोणतेही तीन विषय विद्यार्थ्यांनी निवडावे आणि तेच विषय पुढील वर्षाकरिता (म्हणजे बी.ए. / बी. एस्सी भाग १, २ व ३) बंधनकारक राहतील. घेतलेल्या ऐच्छिक विषयामध्ये बदल करावयाचा असल्यास प्रवेश घेतल्यानंतर आठ दिवसांचे आत लेखी अर्ज महाविद्यालयाच्या कार्यालयात सादर करावा. त्यानंतर विषयामध्ये कुठलाही बदल होणार नाही व याला सर्वस्वी विद्यार्थी जबाबदार राहतीत.

त्रिवर्षीय पदवी पाठ्यक्रम : (विज्ञान शाखा)
विज्ञान शाखा (बी.एस्सी भाग १,२,३ करिता)

आवश्यक विषय - १) मराठी २) इंग्रजी

ऐच्छिक विषय -

| | | |
|---|---|---|
| 1) Biotechnology | 2) Petrochemical | 3) Industrial Chemistry |
| 4) Microbiology | 5) Food Science | 6) Computer Science |
| 7) Environmental Science | 8) Chemistry | 9) Physics |
| 10) Botany | 11) Zoology | 12) Mathematics |

खालीलपैकी कोणताही एक गट

बारावीला (Blo-Group) असणाऱ्यांसाठी कोणताही एक गट -

1) Chemistry, Botany, Zoology
2) Chemistry, Biotechnology, Microbiology
3) Chemistry, Botany/Zoology, Food Science /Environmental Science

बारावीला PCM-Group असणाऱ्यांसाठी कोणताही एक गट -
1) Physics, Chemistry, Mathematics
2) Physics, Computer Science, Mathematics
3) Physics, Mathematics, Industrial Chemistry/Petrochemical Science

## १२ वी एम.सी.व्ही.सी. च्या खालील ट्रेड असणाऱ्या विद्यार्थ्यांना विज्ञान शाखेत प्रवेश घेता येईल

| Sr. No. | MCVC Trades | Select Code | Compulsory Subject | Optional Subject |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1. | Para Medical Group Medical Laboratory Technician Trade | OA OB OC | Chemistry | Botany, Zoology, Microbiology, Biotechnology, Environmental Sci. |
| 2. | Agriculture Group Horticulture Trade or Crop Science Trade | KA KB KC LA LB LC | Chemistry | Zoology, Env. Sci. Microbiology, Biotechnology, Botany |
| 3. | Fisheries Group Inland Fisheries Trade Fish Processing Technology Trade | NA NB NC | Chemistry | Botany, Zoology, Microbiology, Biotechnology, Environmental Sci. |
| 4. | Engineering & Technology Group Technology Trade | EA EB EC | Chemistry | Botany, Zoology, Microbiology, Biotechnology, Environmental Sci. |



वैशिष्ट्यपूर्ण अभ्यासक्रमाची विशेष माहिती

१) पेट्रोकेमिकल सायन्स (Petrochemical Science) -

पेट्रोकेमिकल सायन्स हा विषय विशेषात्वाने पेट्रोकेमिकल उद्योगाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आखलेला विषय आहे. जे विद्यार्थी हा विषय अभ्यासक्रमासाठी निवडतील त्यांना पेट्रोकेमिकल रिफायनरी, पेट्रोकेमिकल स्टोअरेज डेपो व पेट्रोकेमिकल मायनिंग (खनिज विहीरी) ह्या क्षेत्रात तातडीने रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. तसेच ह्या अभ्यासक्रमातील पदव्युत्तर शिक्षणासाठी पुणे, बंगलोर, अलीगड, मुंबई, मद्रास आदी ठिकाणी अतिशय Specialized Courses उपलब्ध असुन येथूनच आखाती व खनिज तेल उत्पादक देशांसाठीच्या नोकरीच्या संधी उपलब्ध आहे. विदर्भातील विद्यार्थी ह्या क्षेत्रात अग्रेसर राहण्याच्या दृष्टीने महाविद्यालयाने हा अभ्यासक्रम सुरु केला आहे. प्रत्यक्ष रिफायनरी व अन्य शैक्षणिक संस्थामध्ये अनुभव देण्याची योजना महाविद्यालय दरवर्षी राबविणार आहे.

२) जिव तंत्रज्ञान (Biotechnology) -

२१ व्या शतकातील आव्हानांना पेलण्याचे सामर्थ्य असणारा विषय अशी ज्याची ओळख आहे तो. म्हणजे (जिव तंत्रज्ञान) शेती, विज्ञान, आरोग्य, औषधी शेती पूरक उद्योगधंदे, संशोधन, मानवी विज्ञान आदी सारख्या महत्वपूर्ण क्षेत्रासाठी (Biotechnology) विषयाचा उपयोग आता अनिवार्य झाला आहे. एकट्या भारतामध्ये आगामी काही वर्षात लाखोंच्या संख्येने असे प्रशिक्षणार्थींची निरनिराळ्या क्षेत्रात आवश्यकता भासणार आहे. ही गरज ओळखून महाविद्यायाने ह्या विषयाची मांडणी केली आहे.

३) अन्नशास्त्र (Food Science) -

आपण पाहतो आहे की, भारताची लोकसंख्या व जगातील बाजारपेठेच्या अन्न प्रक्रिया घटकांची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. भारतात उपलब्ध असलेले मनुष्यबळ अतिशय माफक दरांमध्ये जागतिक स्पर्धेत टिकणारे अन्न प्रक्रिया केलेली उत्पादने बाजारपेठेत उपलब्ध करुन देण्यात सक्षम आहे. दिवेसेदिवस भारताची देशांअंतर्गत खाद्या पदार्थाची बाजारपेठ वेगाने विकसित होत आहे. अन्न प्रक्रिया उद्योगाला दिवसेंदिवस वाढती मागणी येत आहे. झपाट्याने वाढणारे शहरीकरण व शहरातील नोकरदार, उद्योग क्षेत्रातील व्यक्तिंच्या व्यवस्थेमुळे पोषणमुल्य असलेले तयार खाद्य पदार्थ खरेदी करण्याकडे कल वाढतो आहे. याच बरोबरीने फळे, फुले, दुग्धजन्य पदार्थाची नीट साठवणूक करुन परदेशी बाजार पेठ काबीज करण्याचे मोठे आव्हान खाद्य पदार्थ व अन्न प्रक्रिया उद्योगासमोर आहे. बरोबरीने स्वयंरोजगार व मोठ्या प्रमाणावर पैसा मिळवून देण्याची क्षमता खाद्य पदार्थ उद्योगात आहे. ह्या उद्योगाच्या भरभराटीसाठी आवश्यक तंत्रज्ञान पूरविण्याचे सामर्थ (अन्नशास्त्र) ह्या विषयात आहे. आणि म्हणूनच हा अभ्यासक्रम महाविद्यालयाने विद्यार्थ्यांच्या गरजा पूर्ण करण्यसाठी निवडला आहे.

४) पर्यावरण शास्त्र (Environmental Science) -

आधुनिक युग हे विज्ञान व तंत्रज्ञानाचे आहे मानवाने विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या बळावर आज प्रत्येक क्षेत्रात शिखर गाठलंय परंतु हे सर्व करीत असतांना तो विसरतोय त्याचं सृष्टीशी असलेले नातं, तो विसरतोय त्याच्या प्रगतीचा पाया आणि दुर्लक्ष करतो आहे. जीवनदायी पर्यावरणाकडे आज आपण प्रत्येक माध्यमातुन प्रदुषण, ग्लोबल वार्मिंग, हरितगृह प्रभाव, अलनिनो प्रभाव या सारख्या पर्यावरणाशी संबंधीत गोष्टी ऐकतोय, वाचतोय. या सर्व बाबी मंदगतीने होणाऱ्या पर्यावरण -ह्रासाची चिन्ह आहेत. मग यावर उपाय काय? ही जबाबदारी आहे तरी कोणाची ? (पर्यावरणाच्या वाढत्या असमतोलास आपण सर्वच जबाबदार आहोत. याला कारण म्हणजे, पर्यावरणासंबंधीचे आपले अज्ञान. यासाठी आज समाजाच्या प्रत्येक स्तरावर पर्यावरणासंबधी अभ्यास ही आवश्यक बाब झाली आहे. पर्यावरणासंबंधी जागरुकता ही आज प्रत्येकाची नैतिक जबाबदारी झाली आहे.

या सर्व बाबी ग्राह्य धरून महाविद्यालयाने या वर्षापासून आवर्जून पर्यावरणशास्त्र पदवी हा अभ्यासक्रम सुरू केला आहे. शासनानेसुध्दा शिक्षण क्षेत्रात प्राथमिक स्तरापासून पर्यावरण हा 'विषय आवश्यक केला आहे.

पर्यावरणशास्त्र विषयासाठी सुसज्ज प्रयोगशाळा, स्वतंत्र प्राध्यापक वर्ग, प्रत्यक्षप्रात्यक्षिकासाठी वनस्पती उद्यान तसेच ग्रंथसुविधा ही महावद्यालयाची वैशिष्ट्ये आहेत. आज औद्योगिक क्षेत्रात, शासकीय यंत्रणेय पर्यावरण विशेषज्ञ, अधिकारी आदी पदे विशेषकरुन समाविष्ट केलेली आहे. पर्यावरणासंबंधी खाजगी व्यवस्थापक (Private Pollution Controller) आजची जमेची बाजू आहे. 'पर्यावरणशास्त्र' या विषयाच्या अनुषंगाने, आज आपल्या समाजातील युवकांना, स्वयंरोजगाराच्या व सामाजिक समस्यांच्या उद्बोधनाच्या अनेक संधी उपलब्ध आहे. अशाप्रकारे पर्यावरणशास्त्र हे व्यक्तिहिताबरोबरच देशहिताला प्राधान्य देणारे अग्रगण्य शास्त्र आहे.

५) सुक्ष्मजिवशास्त्र (Microbiology) -

एकविसाव्या शतकातील सुक्ष्मजिवशास्त्राचे महत्व व व्याप्ती औद्योगिक विकासाकरिता व इतर वेगवेगळ्या लघु व्यवसायाकरिता खुप महत्वाचे आहे. या विषयातील नौकरीच्या संधी पाहता महाविद्यालयाने अद्यावत सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. जेणेकरून विद्यार्थ्यांचा प्रात्यक्षीक कल वाढेल व विद्यार्थ्यांमध्ये त्याची जिद्द निर्माण होईल.

६) संगणकशास्त्र विभाग (Computer Science) -

संगणक क्षेत्राविषयक....

संगणक हे जगातील सर्वात वेगाने वाढणारे, प्रगत होणारे एकमेव क्षेत्र आहे. यापूर्वी इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातही अशीच प्रगती झाली परंतु संगणक तंत्रज्ञान प्रगतीचा वेग प्रचंड आहे. दर तासाला जगभरात कोठेतरी सॉफ्टवेअर / हार्डवेअरची नवीन तंत्रज्ञान विकसित होत असते. संगणकासोबतच दळणवळणाच्या अत्यंत उच्च तंत्रज्ञानाची, इंटरनेटची प्रगती प्रसाद फार मोठ्या प्रमाणात होत आहे. संगणक व दळणवळण तंत्रज्ञान मिळून इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी म्हणून हे क्षेत्र ओळखल्या जावून लागले आहे व यामुळे औद्योगिक क्षेत्रात येणाऱ्या या नवीन क्रांतीला थर्ड वेव असे म्हटले जात आहे.



संगणक प्रसाराच्या वेळी संगणकामुळे बेकारी वाढली अशी समजूत काही काळ झाली होती. संगणकाचा वेग व क्षमता पाहता काही संस्थामध्ये निश्चिती नोकरी भरतीची संख्या कमी झाली, परंतु असंख्य युवक युवतींकरीता संगणक क्षेत्राच्या स्वरूपात नवीन दालन उघडले गेले आहे. संगणक क्षेत्रात भरपूर रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. यामध्ये डाटा एन्ट्री ऑपरेटर, हे तंत्रज्ञानापर्यंत अनेक प्रकारचे रोजगार उपलब्ध होऊ शकतात. जे विद्यार्थी आपल्या शालेय अभ्यासात यशस्वी होऊ शकले नाही अशा विद्यार्थ्यांनी संगणक, त्याचे किबोर्ड व त्या संबंधीचे कार्य याचे प्राथमिक ज्ञान घेतले तर त्यांना ऑपरेटर म्हणून अनेक नोकऱ्या उपलब्ध होऊ शकतात. साधारणतः संगणक ऑपरेटर होण्याकरीता संगणाकचे मुलभूत ज्ञान डॉस, विंडोज व मायक्रोसॉफ्टच्या एम.एस. ऑफिस या सॉफ्टवेअर पॅकेजचे ज्ञान असणे अपेक्षित असते.

७) औद्योगिक रसायनशास्त्र (Industrial Chemistry) -

आज आपण एकविसाव्या शतकात प्रवेश केला आहे. या क्षणापर्यंत रसायनशास्त्र विषयाची मर्यादा प्रचंड प्रमाणात वाढली आहे. विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत रसायनशास्त्र या विषयाची व्याप्ती ही फारच मर्यादीत स्वरूपाची होती. परंतु पुढे मानवी जीवनाच्या कक्षा जशा रूंदावत गेल्या तशी आवश्यकतेनुरूप रसाशनशास्त्र या विषयाची व्याप्ती वाढत गेली याचे स्वरूप सुध्दा अधिक स्पष्ट होत गेले. याविषयाची एक अत्यंत महत्वाची शाखा म्हणजे औद्योगिक रसायनशास्त्र ही होय.

आधुनिक काळात बरेच नवे तंत्र विकसित होत गेली आणि औद्योगिक उत्पादनात प्रचंड वाढ झाली. त्या अनुषंगाने रासायनिक उद्योगधंदे सुध्दा मोठ्या प्रमाणात वाढले व देशाच्या प्रगतीत एक मोठे आधारवड म्हणून पुढे झाली. त्यामुळे या उद्योगांना प्रशिक्षीत मनुष्यबळीची कमतरता भासू लागली तसेच उपलब्ध मनुष्यबळ अद्यावत ज्ञानाअभावी अकार्यक्षम ठरू लागले. या कारणास्तव औद्यागिक रसायनशास्त्र या विषयामध्ये एक रासायनिक उद्योग सुरू करण्यापासून ते त्याला यशस्वरित्या चालवण्यापर्यंत लागणाऱ्या बाबींचा अंतर्भाव केलेला आहे.

आमच्या महाविद्यालयातून औद्यागिक रसायनशास्त्र या विषयाची पदवी प्राप्त करणारा विद्यार्थी हा स्वबळावर व्यवसाय करू शकतो किंवा याच विषयातील पदव्युत्तर शिक्षण (एम. एस्सी) अमरावती, नांदेड, औरंगाबाद, पुणे, दिल्ली या विद्यापीठात घेऊ शकतो.

अमरावती जिल्हा हा मध्य प्रदेशाच्या सीमेलगत आहे. सातपुडा पर्वताचा फार मोठा भाग या जिल्ह्याला संलग्न असल्यामुळे नैसर्गिक साधन सामुग्री व खनीज संपत्ती प्रचंड प्रमाणात उपलब्ध आहे. या उपलब्ध असलेल्या साधन सामुग्रीचा उपयोग निरनिराळे उद्योग चालविण्याकरीता होणार असल्यामुळे या संपूर्ण बाबींचा विचार करून केंद्र व राज्य सरकारने अमरावती नजिक नांदगांव पेठ येथे मोठे औद्योगिक संकुल उभारले आहे. हे संकुल नजिकच्या भविष्यात अशिया खंडातील एक अग्रक्रमाचे औद्योगिक पूर्ण केल्यावर विद्यार्थी स्वतःच्या व्यवासय सुरू करू शकतात. त्यामुळे औद्योगिक रसायनशास्त्र हा अभ्यासक्रम अमरावती विभागातीलच नव्हे तर विदर्भातील विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी उपलब्ध देवू कराणारा ठरेल.

# महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी विशेष योजना

महाविद्यालयात विज्ञान शाखेत शिकणारे विद्यार्थी आपल्या क्षमतांचा पूरेपूर उपयोग करुन जागतिक स्पर्धेत संपूर्ण तयारी ने उतरावेत यासाठी महाविद्यालय खालील योजनांची आखणी करत आहे. या योजनांचा पूरेपूर लाभ घेऊन विद्यार्थ्यांनी स्वत:ला आपल्या पदावर उभे करण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन व्यवस्थापक करित आहे.

महाविद्यालयाचे सुसज्ज ग्रंथालय -
महाविद्यालयातील विद्यार्थी हा स्पर्धेच्या युगात तत्पर व ज्ञानपूर्वी असण्यसाठी स्वतंत्र वाचनालयाची आवश्यकता आहे. असे स्वतंत्र ग्रंथालय महाविद्यालयात उपलब्ध आहे.

करीअर कौन्सिलिंग सेल-
विद्यार्थीना भविष्याच्या दृष्टीकोनातून त्यांच्या करीअरविषयक मार्गदर्शन करण्याकरिता महाविद्यालयाचे स्वतंत्र करीअर कौन्सिलींग सेल स्थापन केला असून विद्यार्थ्यांची अभिरूची व क्षमता लक्षात घेऊन त्याला या सेल द्वारे मार्गदर्शन करण्यात येते. विद्यार्थ्याला केवळ IS, IPS MPSC ह्याच स्पर्धात्मक परिक्षांची माहिती आहे महाविद्यालयात शिकविल्या जाणाऱ्या विषयांच्या । आधारावर शेकडो प्रकारच्या स्पर्धात्मक परिक्षांची तयारी हाऊ शकते अशा स्पर्धात्मक परिक्षांची तयारी करवून घेण्यासाठी महाविद्यालय वचनबध्द आहे. यासाठी सर्व तयारीसाठी विद्यार्थ्यांचा पुढाकार अत्यावश्यक आहे. यासाठी स्वतंत्र रचना, संगणकाचा उपयोग, अद्यावत पुस्तकांचे ग्रंथालय अशा पायाभूत सोयी महाविद्यालय करीअर कौन्सिलिंग सेलमार्फत पुरवते.



# करिअर कट्टा



**Draft to include in Prospectus**

**Career Katta**

**(Career and Entrepreneurship Counseling, Skill Development, Internships, Placement, etc.)**

Career Katta is an initiative of Department of Higher and Technical Education, Govt of Maharashtra and in coordination with Maharashtra Information Technology Support Centre. The college conducts various activities to guide students about Career, Competitive Examinations (UPSC, MPSC, Banking, SSB, SSC, Police, LIC, etc.), Entrepreneurship, Skill Development; Credit Earnings under new CBCS and NEP Curriculum Framework, Internship and Placement Opportunities, etc.

**Eligibility to Join:**

Any student admitted for any regular course in the college or college alumni referred by College Coordinator.

**Registration Fees:** One Time Rs. 365 for Three-year degree period (Rs. 0.36 per day), which will be reimbursed in the form of subsidy on examination charges of CBCS. It including free access to all the activities, courses, State Level Competitive Exams, etc.

**How to Register:** Download the MITSC application from Google Play Store and pay fees using any online payment mode

**College Code:** A463 (Please include the Career Katta code of the College)

**Contact:** For more details visit college webpage www.yuvashakticollege.org or contact Coordinator Dr. D. K. Raut or Career Katta Helpline 75076 52555






# महाविद्यालयीन प्रवेश प्रक्रिया

प्रवेश अर्ज :

महाविद्यालयाचे शैक्षणिक सत्र ३ जुलै २०२३ पासून सुरू होईल. महाविद्यालयात प्रवेश अर्ज मिळविण्यासाठी माहितीपत्रकात जोडलेल्या ठराविक नमुन्यात अर्ज केला पहिजे. प्रवेश अर्ज उमेदवाराच्या हस्ताक्षरात असावा. त्यावर प्रवेशाच्या शर्तींना मान्यता देणारी पालकांची (आई/वडील) सही असणे आवश्यक आहे.

महाविद्यालय प्रवेशासाठी आवश्यक प्रमाणपत्रे -

१) शाळा / महाविद्यालय सोडल्याचे प्रमाणपत्र (टी.सी. मुळ प्रत व छायांकित ३ प्रत) -
यांपूर्वी शिकत असलेल्या शाळा/ महाविद्यालय सोडल्याचा मुळ दाखला.

२) खंड प्रमाणपत्र व जात प्रमाणपत्र (छायांकित प्रत)
अर्जदाराने शिक्षणात खंड पडला असल्यास त्या कालावधीचे खंड बाबतचे स्पष्टीकरणात्मक, जबाबदारी अधिकाऱ्याच्या सही व शिक्याचे प्रतिज्ञापत्र सादर करावे. तसेच जात प्रमाणपत्राची सत्यप्रत सोबत जोडावी.

३) गुणपत्रिका(१० वी व १२ वी छायांकित ३ प्रत)
विद्यापीठाची किंवा म.रा.मा.शि. मंडळाचे कार्यवाह यांच्या सही व शिक्याचे प्रमाणपत्राची सत्यप्रत.

४) स्थानांतरण प्रमाणपत्र (मायग्रेशन सर्टिफिकेट) -
अमरावती विद्यापीठा व्यतिरिक्त इतर मान्याप्राप्त विद्यापीठाची परीक्षा उत्तीर्ण केली असेल तर, तसेच म.रा.उ.मा.शि. मंडळ, अमरावती, यांच्या व्यतिरिक्त परीक्षा उत्तीर्ण केली असल्यास स्थानांतरण प्रमाणपत्र विद्यापीठाने ठरविलेल्या मुदतीपर्यंत कर्यालयात आणून देणे आवश्यक आहे. अन्यथा प्रवेश रद्द समजल्या जाईल. या अर्जासोबत विद्यार्थ्यांला रू.१००/- अधिक शुल्क भरावे लागेल. हे प्रमाणपत्र आणण्यास विलंब झाल्यास १७० रु. विलंब शुल्क भरावे लागेल.

५) नोकरी करीत असल्याचे प्रमाणपत्र (एम्प्लॉयमेंट सर्टिफिकेट) -
जे उमेदवार नोकरी करीत असतील अशा उमेदवारांनी आपल्या प्रवेश अर्जासोबत नोकरी करीत असल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. प्रवेश अर्जावर उमेदवाराचे छायाचित्र जोडणे आवश्यक आहे. प्रवेशाबाबत प्राचार्याचा निर्णय अंतिम राहील. तसेच काही अडचण आल्यास त्यास विद्यार्थी जबाबदार राहील.

६) आधार कार्ड (छायांकित प्रत व ३ पासपोर्ट साईज फोटो)

प्रवेशाकरीता शैक्षणिक पात्रता -

बी.एस्सी. भाग १ साठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या महाराष्ट्रातील कोणत्याही उच्च माध्यमिक मंडळाची १२ वी ची परीक्षा किंवा समतुल्य परीक्षा विज्ञान विषय घेऊन उत्तीर्ण केलेली असावी. पर्यावरणशास्त्र, जैवतंत्रज्ञान हा विषय घेणाऱ्यास बारावीमध्ये जीवशास्त्र हा विषय असणे आवश्यक आहे. औद्योगिक रसायनशास्त्र व संगणकशास्त्र, प्रेट्रोकेमिकल सायन्स या विषयांसाठी गणित हा विषय आवश्यक आहे. -

टिप : एम.सी.व्ही.सी. च्या विद्यार्थ्यांना सुध्दा बी. एस्सी भाग १ ला संबंधीत विषयातील नियमाप्रमाणे प्रवेश दिला जाईल.

बी.ए. भाग १ साठी - प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याने महाराष्ट्रातील कोणत्याही उच्च माध्यमिक मंडळाची १२ वी ची परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

बी. एस्सी व बी.ए. भाग-२ साठी - प्रवेश घेऊ इच्छीणाऱ्या विद्यार्थ्याने महाराष्ट्रातील विद्यापीठातून माहितीपत्रकात दिलेल्या कोणत्याही गटाचे विषय घेऊन बी. एस्सी भाग १ व बी. ए. भाग १ परीक्षा उत्तीर्ण असावा. प्रवेशासाठी राखीव जागा :

विविध प्रवर्गासाठी असलेल्या राखीव जागा महाविद्यालयात खालील प्रमाणे राहतील.

1. Schedule Caste - 13%
2. Schedule Tribe - 7%
3. Vimukta Jamati(A) VJ - 3%
4. Nomadic Tribe(B) (NT1) - 2.5%
5. Nomadic Tribe(C) (Nt2) - 3.5%
6. Nomadic Tribe(D) (Nt3) - 2%
7. Other Backward Class(OBC) - 19%
8. Special Backward Class (SBC) - 2%
9. Maratha and Socially & Economically Backward Classes(SEBC) - 16%
10. Economically Backward Students in Open Category - 10%



# शैक्षणिक शुल्क २०२३–२४

## बी.एस्सी. वर्गाकरिता

| Sr. No. | Particulars | I | II | III |
|---|---|---|---|---|
| 1 | Tuition Fee | 2400.00 | 2400.00 | 2400.00 |
| 2 | Practical Fee | 4800.00 | 4800.00 | 4800.00 |
| 3 | University Annual Fee | 85.00 | 85.00 | 85.00 |
| 4 | Environmental Exam | - | 160.00 | - |
| 5 | University Enrolment Fee | 120.00 | - | - |
| 6 | Physical Efficiency Fee Test | 30.00 | 45.00 | 45.00 |
| 7 | Library Fee | 160.00 | 160.00 | 160.00 |
| 8 | Medical Examination Fee | 55.00 | 55.00 | 55.00 |
| 9 | Identity Card Fee | 35.00 | 35.00 | 35.00 |
| 10 | Extra-Curricular Activities | 85.00 | 85.00 | 85.00 |
| 11 | Games & Sports Fee | 160.00 | 160.00 | 160.00 |
| 12 | Student Safety Insurance | 10.00 | 10.00 | 10.00 |
| 13 | Facility Fee | 85.00 | 85.00 | 85.00 |
| 14 | Magazine Fee | 85.00 | 85.00 | 85.00 |
| 15 | Emergency Fund | 10.00 | 10.00 | 10.00 |
| 16 | SWF Fee | 10.00 | 10.00 | 10.00 |
| 17 | College Exam Fee | 120.00 | 120.00 | 120.00 |
| 18 | Uni. Student Council Fee | 05.00 | 05.00 | 05.00 |
| 19 | IUSM Fee | 30.00 | 30.00 | 30.00 |
| 20 | Corpus Fund | 10.00 | 10.00 | 10.00 |
| 21 | Student Fund Aid | 25.00 | 25.00 | 25.00 |
| 22 | Ashwamegh Fee | 30.00 | 30.00 | 30.00 |
| 23 | Vehicle Stand | 60.00 | 60.00 | 60.00 |
| 24 | Security | 60.00 | 60.00 | 60.00 |
| 25 | Green & Smart Campus Fee | 10.00 | 10.00 | 10.00 |
| 26 | E-Suvidha | 10.00 | 10.00 | 10.00 |
| 27 | Excursion/Industrial Tour/Field Visit | 100.00 | 100.00 | 100.00 |
| | **Total** | **8590.00** | **8630.00** | **8470.00** |

टिप : बी.एस्सी. भाग–१ च्या उशिरा प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना नामांकन शुल्क १२०/– याप्रमाने लागेल

# शैक्षणिक शुल्क २०२३-२४

## बी.ए. वर्गाकरिता

| Sr. No. | Particulars | I | II | III |
|---|---|---|---|---|
| 1 | Tuition Fee | 800.00 | 800.00 | 800.00 |
| 2 | Practical Fee | 485.00 | 485.00 | 485.00 |
| 3 | University Annual Fee | 85.00 | 85.00 | 85.00 |
| 4 | Environmental Exam | - | 160.00 | - |
| 5 | University Enrolment Fee | 120.00 | - | - |
| 6 | Physical Efficiency Fee Test | 30.00 | 30.00 | 30.00 |
| 7 | Library Fee | 160.00 | 160.00 | 160.00 |
| 8 | Medical Examination Fee | 55.00 | 55.00 | 55.00 |
| 9 | Identity Card Fee | 35.00 | 35.00 | 35.00 |
| 10 | Extra-Curricular Activities | 85.00 | 85.00 | 85.00 |
| 11 | Games & Sports Fee | 160.00 | 160.00 | 160.00 |
| 12 | Student Safety Insurance | 10.00 | 10.00 | 10.00 |
| 13 | Facility Fee | 85.00 | 85.00 | 85.00 |
| 14 | Magazine Fee | 85.00 | 85.00 | 85.00 |
| 15 | Emergency Fund | 10.00 | 10.00 | 10.00 |
| 16 | SWF Fee | 10.00 | 10.00 | 10.00 |
| 17 | College Exam Fee | 120.00 | 120.00 | 120.00 |
| 18 | Uni. Student Council Fee | 05.00 | 05.00 | 05.00 |
| 19 | IUSM Fee | 30.00 | 30.00 | 30.00 |
| 20 | Corpus Fund | 10.00 | 10.00 | 10.00 |
| 21 | Student Fund Aid | 25.00 | 25.00 | 25.00 |
| 22 | Ashwamegh Fee | 30.00 | 30.00 | 30.00 |
| 23 | Vehicle Stand | 60.00 | 60.00 | 60.00 |
| 24 | Security | 60.00 | 60.00 | 60.00 |
| 25 | Green & Smart Campus Fee | 10.00 | 10.00 | 10.00 |
| 26 | E-Suvidha | 10.00 | 10.00 | 10.00 |
| 27 | Excursion/Industrial Tour/Field Visit | 100.00 | 100.00 | 100.00 |
| | **Total** | **2675.00** | **2715.00** | **2555.00** |

टिप : बी.ए. भाग-१ च्या उशिरा प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना नामांकन शुल्क १२०/- याप्रमाने लागेल



## ❊ सूचना ❊

**शासनाकडून व विद्यापीठाकडून वेळोवळी शिष्यवृत्ती व शुल्कात झालेले बद्दल विद्यार्थ्यांना बंधनकारकर राहील.**

## प्रवेश रद्द करण्यासंबंधी सूचना

PART 'D'
REFUND OF FEES

As per UGC notification of October, 2018, para 4.1.3 if a student chooses to withdraw from the programme of the study in which he/she is enrolled. The institution concerned shall follow the following five-tier system for the refund of fees remitted by the student.

| Sr.No. | Percentage of Refund of Fees | Point the time when notice of withdrawal of admission is received in the HEI |
|---|---|---|
| 1) | 100% | 15 days or more before the formally-notified last date of admission |
| 2) | 90% | Less than 15 days before the formally - notified last date of admission |
| 3) | 80% | 15 days or less after the formally - notified last date of admission |
| 4) | 50% | 15 days or less after the formally - notified last date of admission |
| 5) | 00% | More than 30 days after formally notified last date of admission |

### ❊ शुल्कासंबंधी विशेष सूचना ❊

१)महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर शैक्षणिक वर्षांचे संपूर्ण शुल्क भरण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील. विद्यार्थ्याने कोणत्याही कारणास्तव महाविद्यालयात येणे बंद केल्यास किंवा महाविद्यालय सोडल्यास, त्याला वर्षांचे संपूर्ण शुल्क भरावे लागेल.

२)जाहीर केलेल्या तारखेपर्यंत शुल्क न भरल्यास विद्यार्थ्यांचे नांव हजेरीपटावरुन काढले जाऊ शकते. त्यानंतर प्रवेश देणे व नाकाराणे हे प्रवेश समितीच्या अधिकारात राहील.

३)शुल्कात वेळोवळी होणारा बदल प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांला व पाल

४)एका विद्या शाखेत प्रवेश घेतल्यानंतर दुसऱ्या विद्याशाखेत प्रवेश घ्यावयाचा असल्यास विद्यार्थीला प्रवेश शुल्क व इतर शुल्क भरावे लागतील.

५)विद्यापीठच्या वार्षिक परिक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांला सर्व प्रकारची शुल्क परिक्षेचे आवेदनपत्र भरण्यापूर्वी किंवा परिक्षा शुल्कासोबत भरणे बंधनकारक आहे.

६)शिक्षण शुल्क परत करण्यासंबंधी - विज्ञान विद्याशाखेतील प्रवेश मिळालेल्या विद्यार्थी जर व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमासाठी (वैद्यकीय अथवा अभियांत्रिकी ) प्रवेश मिळाला म्हणून महाविद्यालय सोडून जात असेल तर त्याला पुढील अटीवर शिक्षण शुल्क परत मिळू शकेल.

अ) प्रवेशाकरिता अर्ज करतांना आपण एक वा अनेक व्यावसायिक महाविद्यालयाकडे अर्ज केले आहे. असे कळविले पाहिजे.

ब) व्यावसायिक महाविद्यालयात प्रवेश घेतल्यापासून पंधरा दिवसाच्या आत या महाविद्यालयाकडे अर्ज करावा. अर्जासोबत तत्सम महाविद्यालयाच्या प्राचार्याचे प्रवेश मिळाल्यास तारखेचा निर्देश असलेले प्रमाणपत्र आवश्यक राहिल.

७)प्रयोग शाळेत विद्यार्थ्यांकडून कोणतेही उपकरण फुटल्यास किंवा हरविल्यास चालू वर्षातील मूल्याप्रमाणे त्याची किंमत भरुन द्यावी लागेल.

## ❊ शुल्क माफीची सवलत /शासनमान्य शिष्यवृत्ती ❊

महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांला विविध शैक्षणिक शुल्क सवलती व शिष्यवृत्ती उपलब्ध आहेत. या संबंधीच्या माहितीसाठी संबंधीत लिपीकाशी संपर्क साधावा. प्रवेश घेतल्यानंतर मिळू शकणाऱ्या अशा शिष्यवृत्ती किंवा सवलतीच्या माहितीसाठी विद्यार्थ्याने वेळोवेळी सूचनाफलक पाहावा किंवा दिलेल्या मुदतीच्या आत आपले ऑनलाईन अर्ज भरुन त्याची कागदपत्रे महाविद्यालयात जमा केल्यानंतरच त्या शिष्यवृत्तीचा अर्ज ग्राह्य धरण्यात येईल व त्याची उपस्थिती ७५% पेक्षा जास्त असने आवश्यक आहे. कोणत्याही कारणास्तव व त्रुटीमुळे विद्यार्थ्यांचा अर्ज नाकारला गेल्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही. सवलती व शिष्यवृत्तीसाठी अर्ज दिल्याबद्दल महाविद्यालयाच्या नोंदणी पुस्तिकेत विद्यार्थ्याने सही करणे अनिवार्य आहे. अन्यथा हा अर्ज दाखल आहे असे समजू नये.

१)इ.बी.सी. / राजर्षी शाहु महाराज शिष्यवृत्ती सवलतः आर्थिकदृष्ट्या मागास घटकातील विद्यार्थ्यांना ही सवलत मिळते. अशा विद्यार्थ्यांच्या आई-वडिलांचे सर्व मार्गांनी मिळून वार्षिक उत्पन्न रु.६00,000/- चे आत असावे. हजेरीचे प्रमाण ७५% असावे. अर्जासोबत उत्पन्नाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

२)भारत सरकार शिष्यवृत्तीः अनुसूचित जाती, जमाती, नवबौध्द व भटक्या व विमुक्त जमातीच्या विद्यार्थ्याला ही सवलत मिळते. त्यासाठी त्याला उत्तम गुण असावे लागतात.

३)ओपन मेरीट फ्री स्टूडंटशीपः मागास जातीचे नसलेल्या विद्यार्थ्यांना, ज्यांच्या आई-वडिलांचे वार्षिक उत्पन्न रु.६,00,000/- च्या आत आहे अशा विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती मिळते. मात्र यासाठी संबंधीत विद्यार्थ्याला उत्तम गुण असावे लागतात.

४)प्राथमिक शाळा शिक्षकांच्या पाल्यांना मिळणारी शिष्यवृत्ती : प्राथमिक शाळा शिक्षकांच्या मुलांना ६0% पेक्षा अधिक गुण असल्यास ही शिष्यवृत्ती मिळू शकते.

५)प्राथमिक शाळा शिक्षकांच्या मुलांना शुल्क सवलत व परिक्षा शुल्क सवलत मिळते.

६)स्वातंत्र्यसंग्राम सैनिकांच्या मुलांना / नातवांना मिळणारी शिष्यवृत्ती

७) अपंग विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्ती



८) स्वर्गीय शंकरराव व पार्वतीबाई जोग शिष्यवृत्ती : (उच्च माध्यमिक शालांतर परिक्षेत पदार्थ विज्ञान विषयात सर्वाधिक गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना अम. विद्यापीठ अमरावती तर्फे शिष्यवृत्ती देण्यात येते.)

वरील सवलती व शिष्यवृतीव्यतिरिक्त इतर काही सवलती उपलब्ध झाल्यास त्या संबंधीची सुचना वेळोवेळी सूचना फलकावर लावण्यात येईल.

सुचना : एकदा मिळालेली शिष्यवृत्ती संबंधित कार्यालयाच्या लेखी आदेशाशिवाय परत करता येणार नाही.

### ए.टी.के.टी. ची सवलतः

### ❊ विज्ञान शाखा – सत्र पद्धती ❊

१)बी.एस्सी.भाग २ या वर्गात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना बी.एस्सी. भाग १ च्या परीक्षेतील सेमीस्टर १ व सेमीस्टर २ यांच्या लेखी व प्रात्यक्षीकांच्या एकुण विषयांपैकी ५0 टक्के विषयात व उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. असे विद्यार्थीच भाग २ च्या प्रवेशाकरीता पात्र ठरतील.

२)बी. एस्सी भाग ३ या वर्गात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना बी.एस्सी. भाग १ च्या परीक्षेतील सेमीस्टर १ व सेमीस्टर २ या दोन्ही सत्रात उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. तसेच भाग २ च्या परीक्षेतील सेमीस्टर ३ व ४ यांच्या लेखी व प्रात्याक्षीकांच्या एकुण विषयांपैकी ५0 टक्के विषयात उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. असे विद्यार्थीच भाग ३ च्या प्रवेशाकरीता पात्र ठरतील.

### ❊ कला शाखा – सत्र पध्दती ❊

१)बी. ए. भाग २ या वर्गात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना बी. ए. भाग १ च्या परीक्षेतील सेमीस्टर १ व सेमीस्टर २ यांच्या लेखी व प्रात्यक्षीकांच्या एकुण विषयांपैकी ५0 टक्के विषयात उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. असे विद्यार्थीच भाग २ च्या प्रवेशाकरीता पात्र ठरतील

२)बी. ए. भाग ३ या वर्गात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना बी.ए. भाग १ ची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील तसेच बी.ए. भाग २ च्या परीक्षेतील एकुण पाच विषयांपैकी कमीतकमी दोन विषयामध्ये उतीर्ण होणे आवश्यक आहे. (संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांच्या वेळोवेळी निर्गमीत होणाऱ्या आदेशानुसारच ए.टी.के. टी. ची सवलत लागु राहील.)

# ❊ महाविद्यालयातील आवश्यक बाबी ❊

ओळखपत्र -
प्रवेश घेतलेल्या विद्यार्थीने, प्रवेश पावती दाखवून महाविद्यालयाच्या कार्यालयातुन ओळखपत्र घ्यावे. त्यावर स्वत:चे छात्राचित्र लावून मा. प्राचार्यांची स्वाक्षरी दि. ५ सप्टेंबरपूर्वी ओळखपत्रावर घ्यावी. त्यानंतर घेतल्यास दंड आकारल्या जाईल. महाविद्यालयीन परिसरात वावरतांना ओळखपत्र जवळ ठेवावे व ओळखपत्र हरविल्यास ते महाविद्यालयातून फी भरुन पुन्हा घेणे आवश्यक राहील.

नामांकन -
जे विद्यार्थी विद्यापीठात प्रथम प्रवेश घेत आहे अशा विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित झाल्यावर कार्यालयातून नामांकन अर्ज घेऊन तो स्वत:च्या सुवाच्च अक्षरात भरुन कार्यालयात सादर करावा. अर्जावर लिहिलेले विषय हे अंतिम राहतील. त्यानंतर विषय कोणाला कोणत्याच परिस्थितीत बदलविता येणार नाही. विषय बदल्यास महाविद्यालय जवाबदार राहणार नाही.

ग्रंथालय -
महाविद्यालयाचे ग्रंथालयात अभ्यासाचे पुस्तके, संदर्भ ग्रंथ, नियतकालीके व दैनिके वर्तमानपत्रे उपलब्ध आहेत. ग्रंथालयात पुस्तकपेढीची व्यवस्था राहील. त्यासंबंधीची माहिती ग्रंथपालाकडे मिळेल. ओळखपत्राशिवाय ग्रंथालयात प्रवेश मिळणार नाही. महाविद्यालयाची सर्व पुस्तके वार्षिक परिक्षेचे प्रवेशपत्र घेण्यापूर्वी परत करावी लागतील व तसेच पुस्तक घेतल्यानंरत ते तारखेच्या आत ग्रंथालयाला परत करणे अनिवार्य राहील. अन्यथा विशिष्ट दंड आकारण्यात येईल. त्यानंतर पुस्तके लागल्यास पुस्तकाची पूर्ण किंमत अनामत रक्कम म्हणून ठेवावी लागेल. या संबधीचा निर्णय प्राचार्याच्या आदेशाप्रमाणे ग्रंथपाल घेतील.

महाविद्यालयात मोबाईल बंदी -
मा. पोलीस आयुक्त अमरावती यांच्या आदेशावरुन महाविद्यालय परिसरात वावरतांना मोबाईल वापरता येणार नाही. त्यामुळे कुठल्याही विद्यार्थ्यांजवळ मोबाईल आढळल्यास तो ताबडतोब जप्त करुन महाविद्यालयाच्या नियमानुसार कार्यवाही केल्या जाईल. तरी पालकांनी सुद्धा या सुचनेची गांभीर्यने दखल घेऊन आपल्या पाल्यास महाविद्यालयास जातांना मोबाईल वापरण्याची बंदी करावी.



शिस्त -
महाविद्यालयाने सम्मत केलेल्या नियमांचे पालन करुन प्रत्येक विद्यार्थ्याने शिस्तीने वागणे आवश्यक आहे. महाविद्यालयात असतांना आपआपली वागणुक उत्कृष्ठ ठेवावी. बेशिस्त विद्यार्थ्यांना महाविद्यालय सोडुन जाण्याचा आदेश दिला जाईल. व तो विद्यर्थ्याला बंधनकारक राहील. महाविद्यालयाच्या परीसरात धुम्रपान करणे व तत्सम साहित्य बाळगणे हा कायदेशीर गुन्हा आहे.

विद्यापीठाची प्रोत्साहनपर विशेष गुण योजना -
राष्ट्रीय सेवा योजना, विविध क्रीडा प्रकार आणि इतर सांस्कृतिक कार्यक्रमासाठी सर्व शाखातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन गुण देण्याची विद्यापीठाची योजना आहे. ही गुणवाढ जास्तीत जास्त १० गुणापर्यंत राहील.

## ❊ अतिरिक्त गुण तालिका ❊

| | |
|---|---|
| १) क. वर्षभर राष्ट्रीय सेवा योजनेत असणे. | ५ गुण |
| ख. वर्षभर सहभाग आणि एक कॅम्प करणे | ६ गुण |
| २) क. विद्यापीठ स्तरावर क्रिडा स्पर्धामध्ये सहभाग | ३ गुण |
| ख. आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धामध्ये सहभाग | ५ गुण |
| ३) क. विद्यापीठ मान्यताप्राप्त आंतर महाविद्यालयीन सांस्कृतिक स्पर्धामध्ये सहभाग | ३ गुण |
| ख. आतंरविद्यापीठ स्तरावरील सांस्कृतिक स्पर्धामध्ये सहभाग | ५ गुण |
| ४) रक्तदान (प्रत्येक वेळेस) (जास्तीत जास्त ५ गुण) | २ गुण |
| ५) शासकीय योजने अंतर्गत आवश्यक सांख्यिकीय माहिती संकलीत करण्यास सहभाग | ५ गुण |

## ❊ क्रीडा, सांस्कृतीक व सामाजिक उपक्रम ❊

महाविद्यालयातर्फे क्रीडा व सांस्कृतिक, सामाजिक उपक्रम राबविले जातात. याद्वारे विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांचा विकास होतो. 'माणूस घडविणे' हे शिक्षणाचे एकमेव उद्दीष्ट डोळ्यासमोर ठेवून महाविद्यालय कार्यक्रम राबविणार आहे.

१) क्रीडा व संस्कृतीच्या संगोपनात महाविद्यालयाचा सहभाग : महाविद्यालयात क्रीडा संस्कृतीची जोपासना कृरुन या माध्यमातून उत्तमोत्तम क्रीडापटू निर्माण करणे ही या महाविद्यालयाची परंपरा आहे. त्यानुसार क्रीडा प्रकारांमध्ये विशेष प्राविण्य प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना महाविद्यालया तर्फे आर्थिक मदत देण्यात येते व अशा विद्यार्थ्यांना विविध क्रीडा तज्ञांचे मार्गदर्शन व तांत्रिक सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतात. विविध पातळ्यांवरील स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढावा यासाठी महाविद्यालय जागरुक आहे.

### महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी नाविन्यपूर्ण योजना व अभ्यासेत्तर उपक्रम

२) राष्ट्रीय सेवा योजना : महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकामध्ये निवडक अशा १०० विद्यार्थ्यांना प्रवेश मिळून शकतो. प्रवेश प्राप्त विद्यार्थ्यांना यासंबंधी नियम पाळावे लागतात. साक्षरता मोहीम, प्रौढ शिक्षण व अन्य कार्यक्रमात विद्यार्थ्यांना भाग घेणे अनिवार्य राहील.

मनुष्य हा समाजाचा घटक आहे. समाजाच्या ऋणांची परतफेड व्हावी, या दृष्टीने विद्यार्थ्यांनी सामाजिक कार्याकडे वळावे. यास्तव महाविद्यालय सतत प्रोत्साहित करीत असते. समाजाचे आदर्श व त्यांच्या विचारांचे कृतीद्वारे अनुकरण व्हावे, यासाठी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना पथक कार्यरत असते. दरवर्षी महाविद्यालया तर्फे रा.से.यो. शिबीर आयोजित करण्यात येते व त्यामध्ये विविध उपक्रम राबविले जातात.

३) शारीरिक क्षमता चाचणी : सामान्यत: जानेवारी किंवा फेब्रुवारी महिन्यात ही चाचणी घेण्यात येते. या चाणीत उपस्थित असणे विद्यार्थ्यांना अनिवार्य आहे. गैरहजर विद्यार्थ्यावर कार्यवाही करण्यात येईल.

४) वैद्यकीय तपासणी : विद्यापीठाच्या महाविद्यालयाच्या पटावरील प्रत्येक विद्यार्थ्याला वैद्यकीय तपासणीला उपस्थित राहावे लागेल. ठराविक वेळेवर उपस्थित न राहिल्यास दंड भरुन तपासणी करुन घ्यावी लागेल. वैद्यकीय तपासणीस अनुपस्थित राहील्यास विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे अशा विद्यार्थ्याला दंड, तात्पुरते काढून टाकणे, कायमचे काढून टाकणे, परीक्षेस बसण्यास अपात्र ठरविणे अशा शिक्षा होवू शकतात.

५) क्रीडा विकास : संस्थेच्या जागेत आंतरराष्ट्रीय दर्जाचा थेलॅटीक ट्रॅक, स्विमींग टॅक आणि हेल्थ क्लब करण्याचे विचाराधीन आहे. या जागेवर राष्ट्रीय व जिल्हा स्तरावरच्या क्रीडा स्पर्धेचे आयोजन करणे व विद्यार्थ्यांमधील क्रीडा गुणांचा विकास होण्यासाठी आवश्यक क्रीडा सोयीउपलब्ध करुन देणे यासाठी संस्था व महाविद्यालय प्रयत्नशील आहे. आंतरमहाविद्यालयीन व आंतर विद्यापीठाच्या स्पर्धेत भाग घेवू न शकणाऱ्या विद्यार्थ्यांना क्रीडा प्रशिक्षकांकडे संपर्क साधून त्यांनी अनुमती दिल्यास अशा स्पर्धेत भाग घेता येईल.



६) शारीरिक शिक्षण : राष्ट्रीय सेवा योजना आंतरमहाविद्यालयीन खेळ व छात्रसेना यात भाग न घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षण वर्गाला हजर राहणे आवश्यक आहे. या वर्गाला ७५% पेक्षा कमी उपस्थिती असल्यास परिक्षेला बसण्यास प्रतिबंध केला जावू शकतो. अनुपस्थिती बद्दल विद्यार्थीना दंड आकारण्यात येईल किंवा पूर्ण वेळ नोकरी, शारीरिक अपात्रता व २७ वर्षापेक्षा अधिक वय एवढ्या कारणांमुळे यातून प्राचार्याच्या परवानगीने सूट मिळू शकते.

७) शैक्षणिक सहल : महाविद्यालय दरवर्षी निरनिराळी प्रेक्षणीय स्थळे पाहण्याकरिता सहलीचे आयोजन करीत असते. या सहलीचे प्रयोजन विद्यार्थीना ऐतिहासिक, भौगोलिक, वन्यजीव व पर्यावरण यासंबंधी माहिती मिळावी हे हाये. यामुळे संबंधित विषयांच्या ज्ञानात भर पडते या व्यतिरिक्त विज्ञान शाखेद्वारे पर्यावरणशास्त्र, वनस्पतीशास्त्र जैवतंत्रज्ञान, पर्यावरणशास्त्र आणि सुक्ष्मजीवशास्त्र या विषयांचे शैक्षणिक सहल किमान वर्षातून एक वेळा अनिवार्य राहील.

८) युवक महोत्सव : अमरावती विद्यापीठ युवक महोत्सवाचे आयोजन दरवर्षी करीत असते. यामध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रम तसेच क्रीडा व इतर स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. सांस्कृतिक कार्यक्रमात रुची असणाऱ्या विद्यार्थीनी महाविद्यालय सुरु झाल्यानंतर संबंधीत प्राध्यापकाजवळ आपली नावे देवून त्या विषयांची माहिती करून घ्यावी. सांस्कृतिक व अन्य स्पर्धेत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अतिरिक्त गुण व विद्यापीठ प्रमाणपत्र देण्यात येते. सामुहिक गायन, सामुहिक नृत्य, नकला, भावगीत, शास्त्रीय गायन इत्यादी कला प्रकारांचा यात समावेश होतो.

९) सांस्कृतिक व सामाजिक उपक्रम : विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, शारीरिक विकासाबरोबर सांस्कृतिक विकास होणे आवश्यक ठरतो. या दृष्टीने महाविद्यालयात वत्कृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, गायन, लघुनाटीका, नृत्य असे विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. विद्यार्थ्यांची साहित्य रुची वाढविण्याकरिता अभिरुची भित्तीचित्र तयार करण्यात येते.

१०) परिक्षेविषयी (महाविद्यालयीन) : विद्यापीठ परिक्षेच्याव्यतिरिक्त महाविद्यालयामध्ये किमान वर्षापोटी दोनदा परिक्षा घेण्यात येतील. ह्या दोन्हीही परिक्षा विद्यार्थीना अनिवार्य राहील. या दोन्ही परीक्षामध्ये विद्यार्थी गैरहजर किंवा परिक्षेमध्ये २५% पेक्षा कमी मार्क मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांस विशिष्ट दंड आकाराला जाईल. पहिली तसेच दुसरी परिक्षा ही साधारणत: ऑक्टोंबर व फेब्रुवारी महिन्यात अनुक्रमे घेण्यात घेईल.

११) सेमिनार : प्रत्येक वर्गात प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये सेमीनार ठेवण्यात येतील. त्याचा विद्यार्थ्यांनी संबंधीत विषयाच्या शिक्षकाकडून योग्य ते मार्गदर्शन घेऊन किमान वर्षातून एक सेमीनार देणे आवश्यक आहे.

१२) वरील परिच्छेदात उल्लेखिलेल्या सुट्ट्या व्यतिरिक्त प्राचार्यांनी जाहीर केलेल्या तीन सुट्ट्या राहतील. महाविद्यातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वरील परिच्छेदाकडून नमूद असलेल्या सुट्ट्या व्यतिरिक्त जिल्ह्याधिकाऱ्यांनी जाहीर केलेल्या सुट्ट्या उपभोगता येणार नाहीत.

विद्यार्थ्यांच्या वर्तनासंबंधी विशेष सूचना

१) विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या सामानाची मोडतोड करु नये, असे काही केल्यास त्याची पूर्ण रक्कम प्राचार्यांनी केलेल्या दंडासह भरावी लागेल.

२) महाविद्यालयाच्या इमारती, विद्युत व्यवस्था यामध्ये बिघाड केल्यास किंवा खिडक्याची तावदाने फोडणे, भिंतीवर लिहीणे, पोस्टर्स चिटकविणे या सारख्या प्रकारात विद्यार्थ्यांचा हात आहे. असे आढळल्यास त्यांना कठोर शिक्षा व दंड करण्यात येईल.

३) महाविद्यालयाच्या परिसरात धुम्रपान करणे, पान खाणे, गुंगी आणणारी पेय व औषधे खाणे यास सक्त मनाई आहे. तसे आढळल्यास कठोर कार्यवाही करण्यात येईल.

४) विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या व्यवस्थेसंबंधी माहिती, प्रसिध्दीकरीता देता कामा नये. या प्रकारात विद्यार्थी दोषी आढळल्यास त्याचेवर शिस्तभंगाची कार्यवाही होईल.

५) विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या परिसरात अथवा महाविद्यालयाच्या नावावर कोठेही राजकीय चळवळ व हिंसात्मक निदर्शने करण्यास मनाई आहे. याबद्दल विद्यार्थ्यांवर शिस्तभंगाची कार्यवाही होईल.

६) सुचनाफलकावरील प्रत्येक सुचना विद्यार्थ्यांनी वाचणे आवश्यक आहे. सूचना न वाचल्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान झाल्यास त्यास महाविद्यालय जबाबदार राहणार आहे.

७) विद्यार्थ्यांच्या कायमच्या अथवा स्थानिक पत्त्यात बदल झाल्यास तसे महाविद्यालय लेखी कळविणे आवश्यक आहे.

८) इतर विद्यार्थी, प्राध्यापक आणि कर्मचारी यांच्याशी सर्व विद्यार्थ्यांचे वर्तन सभ्यतेचे असावे.

९) संस्थेच्या प्रतिष्ठेस बाधा असणारे कोणतेही गैरवर्तन केल्यास, असभ्यपणा व कोणत्याही नियमांबद्दल उपेक्षा दाखविल्यास विद्यार्थ्यांना अमरावती विद्यापीठ अध्यादेशातील तरतुदीनुसार कारवाईस सामोरे जावे लागले.

१०) महाविद्यालयाचे वर्ग सुरु असतांना वर्गासमोरील व्हरांड्यातून विद्यार्थ्यांनी विनाकारण फिरु नये. तसेच कामाशिवाय महाविद्यालयाच्य परिसरात रेंगाळत राहू नये. या नियमांचे उल्लंघन केल्यास प्राचार्याकडून दंड केल्या जाईल.

११) आपल्या तासांच्या व्यतिरिक्त कोणत्याही विद्यार्थी, विद्यार्थीनींनी वर्ग खोल्यांमध्ये जाऊ नये. तसेच आपल्या वर्गाच्या तासाव्यतिरिक्त अन्य वर्गाच्या तासांना बसू नये.

१२) महाविद्यालयाच्या आवारात प्रत्येक विद्यार्थ्यांने महाविद्यालयाने दिलेले ओळखपत्र बाळगणे वतपासणीकरीता त्याची मागणी केल्यास ते तात्काळ सादर करणे आवश्यक राहील.

१३) विद्यार्थ्यांची वर्गातील व महाविद्यालयाच्या आवारातील वर्तणूक इतरांना उपद्रव देणारी नसावी.

१४) महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करणे वा न करणे या संबंधीचा अंतिम निर्णय महाविद्यालयाचे प्राचार्य घेतील व तो निर्णय सर्वांना बंधनकारक राहील.

१५) महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या पुर्वानुमती शिवाय कोणत्याही प्रकारचा निधी परस्पर गोळा करता येणार नाही.



१६) अभ्यासक्रम अंतर्भूत असलेल्या शैक्षणिक सहली व्यतिरिक्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सहली शैक्षणिक सत्रात काढता येणार नाही. तथापि, अध्यापनाच्या कार्यात व्यत्यय न येता, सुटीच्या दिवशी किंवा कालावधीत सहली आयोजित करावयाच्या असतील तर प्राचार्यांची पुर्वानुमती अनिवार्य राहील.

१७) शासन अधिनियम क्र. एफ इ. १०९६ / प्र.क्र. १९७८/९६/शा. शि. - ५ / दि. १३/६/१९९९ नुसार विद्यार्थ्यांची महाविद्यालयातील उपस्थिती ७५% टक्के असणे अनिवार्य आहे. अन्यथा त्याला वार्षिक परिक्षेला बसण्याची परवानगी नाकारण्यात येईल. कोणत्याही पध्दतीने विद्यार्थ्यांची रॅगींग घेण्यास Prohibition of Ragging and other Form of Violence In Educational Institution ct. No. 20 of 1998 नुसार सक्त मनाई आहे.

* पालकांना विशेष सूचना

१) पालकांनी कृपया, विद्यार्थ्यांच्या उपस्थिती विषयीचे, देय शुल्काबद्दलचे व वर्तनाबद्दलचे नियम काळजीपूर्वक वाचावेत व त्यानुसार आपल्या पाल्याचे आचरण रहावे यासाठी अत्यंत दक्ष असावे.

२) महावद्यालयाच्या परीक्षांना विद्यार्थ्यांने बसणे अनिवार्य आहे. अन्यथा त्याला दंड आकारण्यात येईल.

३) विद्यार्थ्यांच्या उपस्थितीचा व प्रगती विषयीचा आढावा पालकांना घेणे आवश्यक आहे. त्यासंबंधी संस्थेने दिलेल्या सूचनांची पालकांनी दखल घ्यावी.

४) विद्यार्थ्यांसंबंधी विविध प्रश्न उपस्थित झाल्यास प्राचार्यांच्या निमंत्रणानुसार पालकांची उपस्थिती अनिवार्य आहे.

५) पालकांनी प्रवेश घेते वेळी माहितीपत्रका मध्ये दिलेली संपुर्ण माहीती वाचावी.

६) पालकांनी त्यांच्या पालकांना शिष्यवृत्ती अर्ज तसेच परिक्षा आवेदन पत्र भरण्यासंबंधी अवगत करावे तसे न केल्यास येणाऱ्या शैक्षणिक अडचणींना ते स्वतः जबाबदार राहतील. तसेच महाविद्यालयाचे शुल्क कमी होणार नाही.

विद्यार्थ्यांच्या माहिती व मार्गदर्शनाकरिता सूचना :

महाविद्यालय किंवा पदव्युत्तर शैक्षणिक विभागात प्रवेश घेतांना विद्यापीठाचे अध्यादेश, नियम व परिनियम सर्व दुरुस्त्यासह माहिती करुन घेणे आवश्यक आहे. विशेषतः प्रवेशाकरिता खालील अध्यादेशातील तरतुदी नीट समजून घेणे, यांची माहिती असणे आवश्यक आहे.

अध्यादेश क्र. १ : विद्यार्थ्यांचे नामांकनसंबंधी
अध्यादेश क्र. २ : विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत
अध्यादेश क्र. ३ : राष्ट्रीय छात्रसेनेमध्ये सहभागी होणेबाबत
अध्यादेश क्र. ४ : विद्यार्थ्यांचे शारीरिक स्वास्थ कल्याण
अध्यादेश क्र. १० : सुट सवलत आणि पुढील वर्गात प्रवेश मिळण्याबाबत
अध्यादेश क्र. १२ : विद्यापीठ शुल्कासंबंधी
अध्यादेश क्र. १.८५ : प्रोत्साहनपर गुणासंबंध

ह्या अध्यादेशाची प्रत विद्यार्थ्यांना संदर्भासाठी महाविद्यालयाच्या ग्रंथालयात उपलब्ध राहील.

**संत गाडगे बाबांचा क्रांतीकारी समाजशील दशसुत्री संदेश**

| | | |
|---|---|---|
| भुकेलेल्यांना | – | अन्न |
| लहानलेल्यांना | – | पाणी |
| उघड्यानागड्यांना | – | वस्त्र |
| गरीब मुलांमुलींना | – | शिक्षणासाठी मदत |
| बेघरांना | – | आसरा |
| अंध, पंगु, रोग्यांना | – | औषधोपचार |
| बेकारांना | – | रोजगार |
| पशु, पक्षी मुक्या प्राण्यांना | – | अभय |
| गरीब तरुण तरुणींचे | – | लग्न |
| दुःखी व निराशांना | | हिंमत |



# Terms, Vacations & Holidays 2023-24

| Activity | Commencement | Concluding Days | Total Days |
|---|---|---|---|
| First Session | Monday, 3rd July, 2023 | Tuesday, 07 Nov 2023 | 104 |
| Admission Process | Monday, 3rd July, 2023 | - | - |
| Induction Programme (For 1st Year Students) | Tuesday, 11th July, 2023 | Friday, 14th July, 223 | 04 |
| Teaching Days (Odd Semesters) | Saturday, 15th July, 2023 | Tuesday, 7th July 2023 | 90 |
| First Term Vacation | Wednesday, 8th November 2023 | Monday, 27th November 2023 | 20 |
| University's Odd Semesters Examinations | Wednesday, 8th November 2023 | Saturday, 30th December 2023 | 39 |
| Academic Session (Second Session) | Tuesday, 28th November 2023 | Saturday, 27th April 2023 | 121 |
| Non-instructional days (For N.S.S., Gathering etc.) | Monday, 1st January 2024 | Thursday, 4th January 2024 | 04 |
| Teaching Days (Even Semesters) | Friday, 5th January 2024 | Saturday, 27 April 2024 | 90 |
| Even semesters University Exam. | Monday, 29th April 2024 | Monday, 10th June 2024 | 35 |
| Second Term Vacation | Monday, 29th April 2024 | Monday, 10th June 2024 | 43 |
| Commencement of Next Academic Session 2024-24 | Tuesday, 11th Jun 2024 | - | - |

# Holidays 2023-24

The University Teaching Departments and University Conducted Colleges / Affiliated Colleges of Sant Gadge Baba Amravati University shall have first session vacation, second session vacation as mentioned in Table-I along with public holidays as given.

| Sr. No. | Activity | Commencement |
|---|---|---|
| 1 | Moharum | Saturday, 29th July 2023 |
| 2 | Independence Day | Tuesday 15th Aug 2023 |
| 3 | Parsi New Year (Shahenshahi) | Wednesday, 16th Aug 2023 |
| 4 | Rakshabandan | Wednesday, 30th Aug 2023 |
| 5 | Shri Ganesh Chaturthi | Tuesday, 19th Sept 2023 |
| 6 | Gauri Pujan | Friday, 22nd Sept 2023 |
| 7 | Anant Chaturdashi / Id-E-Milad | Thursday, 28th Sept 2023 |
| 8 | Mahatma Gandhi Jayanti | Monday, 2nd Oct 2023 |
| 9 | Dussara | Tuesday, 24th Oct 2023 |
| 10 | Christmas | Monday, 25th Dec 2023 |
| 11 | Republic Day | Friday, 26th Jan 2024 |
| 12 | Chatrapati Shivaji Maharaj Jayanti | Monday, 19 Feb 2024 |
| 13 | Mahashivratri | Friday, 8th March 2024 |
| 14 | Holi (Second Day) | Monday, 25th Mar 2024 |
| 15 | Good Friday | Friday, 29 Mar 2024 |
| 16 | Gudhi Padwa | Tuesday, 9th Apr 2024 |
| 17 | Ramzan Id (Id-Ul-Fitar) | Thursday, 11th Apr 2024 |
| 18 | Shriram Navmi | Wednesday, 17th April 2024 |



“We want that Education by Which Character is Formed, Strength of mind is increased, the intellect is expanded and by which one can stand on one's own Feet”



Swami Vivekanand